महाराष्ट्र शासन
सर्वोपचार रुग्णालय ,धुळे
Email ID- deangmcdhule@gmail.com- gmcdhule@gmail.com
अधिष्ठाता यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| महाविद्यालय- फोन नंबर 02562- 239407 | फॅक्स - 02562- 239207 |
| रुग्णालय - फोन नंबर 02562- 297112 | फॅक्स - 02562- 236744 |

जा.क्र .सरुधु/आस्था - नर्सिंग/प्रवेश प्रक्रिया-2017/ /17 दिनांकं :- 29/08/2017

प्रति,
मा. निवासी उपजिल्हाधिकार,
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे.

विषय :- जी.एन.एम. प्रवेश प्रक्रिया २०१७ ची जाहिरात व माहिती पुस्तक dhule.nic.in वर प्रसिध्द करणे बाबत.
संदर्भ:- प्राचार्य,परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय,धुळे यांचे पत्र क्र. पप्रमसरुधु/जाहिरात-वेबसाईट/१७४/२०१७ दिनांकः- २९/०८/२०१७

उपरोक्त विषयान्वये संदर्भिय पत्रानुसार या संस्थेअंतर्गत असलेले परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात २० विद्यर्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेचे कामकाज होत आहे. सदरहु प्रवेश प्रक्रियेसंदर्भात जाहिरात व माहिती पुस्तक धुळे जिल्ह्याच्या शासकिय वेबसाईट (dhule.nic.in) वर आपल्या स्तरावरुन प्रसिध्द करणेसाठी विनंती आहे. जेणेकरुन जीएनएम प्रवेश घेण्यास ईच्छुक उमेदवारांना सदरहु माहीती प्राप्त होवु शकेल. सोबत संदर्भिय पत्राची छायांकीत प्रत सुलभ अवलोकनार्थ जोडलेली आहे.

सहकार्याबद्दल आभारी आहे.

अधिष्ठाता,
सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

प्रत :- मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

# सर्वोपचार रुग्णालय, धुळे

## प्रवेशप्रक्रिया वेळापत्रक २०१७

जाहीरात देणे :- दिनांक ३१.०८.२०१७

अर्ज वाटप :- दिनांक ०१.०९.२०१७ ते ०७.०९.२०१७

(रविवार व इतर शासकिय सुट्टयांदिवशी फॉर्मवाटप सुरुच राहील)

भरलेले प्रवेश अर्ज स्विकारणे :- दिनांक ०१.०९.२०१७ ते ०८.०९.२०१७

(रविवार व इतर शासकिय सुट्टयांदिवशी अर्ज स्विकारणे सुरुच राहील)

प्रवेश अर्ज वाटप व स्विकृतीची वेळ :- सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत

प्रवेश अर्जाची छाननी :- दिनांक ०९.०९.२०१७ ते १०.०९.२०१७

तात्पुरती गुणवत्ता यादी :- ११.०९.२०१७

गुणवत्ता यादी वरील आक्षेप नोंदविणे :- दिनांक ११.०९.२०१७ ते १२.०९.२०१७

मुलाखतीस पात्र ऊमेदवारांची यादी :- १३.०९.२०१७

मुलाखत :- १४.०९.२०१७

निवड झालेल्या उमदेवारांची यादी व निवडपत्र देणे :- १५.०९.२०१७

ऊमेदवारास प्रशिक्षणासाठी हजर राहणे :- १८.०९.२०१७

प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात :- १८.०९.२०१७

# सर्वोपचार रुग्णालय, धुळे

परिचारीका प्रशिक्षण विद्यालय, सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे ऑगस्ट,२०१७ पासून सुरु होणा-या तीन वर्षाच्या जनरल नर्सिंग व मिडवाईफ्री अभ्यासक्रमाकरीता खालील प्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

**शैक्षणिक पात्रता** - (अ) उमेदवार महाराष्ट्र राज्य, उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (१०+२) अथवा समतुल्य परीक्षा शासन मान्य संस्थेमधून प्राधान्याने फिजीक्स, केमेस्ट्री व बॉयोलॉजी या शास्त्र विषयासह व इंग्रजी विषयासह कमीतकमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(ब) वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे ऊमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध झाले नाहीत. तर महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची कोणत्याही शाखेतील आणि कोणत्याही विषयातील उच्च माध्यमिक परिक्षा (१०+२) कमीत कमी ४० टक्के गुणांनी ऊतीर्ण असणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा** :- **३१ डिसेंबर** २०१७ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**जागावाटप** :-

| जात/ प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि. जा. अ. | भ. ज. ब | भ. ज. क. | भ. ज. ड | इमाव/ विमाप्र | खुला | एएन एम/ एमएच डब्ल्यु | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जीएनएम जागा | २ स्त्री + १ पुरुष | १ स्त्री | १ पुरुष | १ स्त्री | - | - | ३ स्त्री + १ पुरुष | ५ + १ अपंग + ३ पुरुष | १ | २० |

१) अपंगासाठी ३ टक्के आरक्षण समांतर राखीव आहे. या जागेवर प्रवेश घेऊ ईच्छिणा-या ऊमेदवारांसाठी - फक्त ४० ते ५० टक्के पायाचे अपंगत्व असलेल्यांनीच अर्ज करावे.

२) कोणताही अर्ज खालीलप्रमाणे कागदपत्रे (सांक्षांकित सत्यप्रत) जोडलेली नसल्यास विचारात घेतला जाणार नाही.

**-: प्रमाणपत्र तक्ता :-**

| अ. क्र. | प्रमाणपत्र | अ. क्र. | प्रमाणपत्र |
|---|---|---|---|
| १ | शाळा सोडल्याचा दाखला | ७ | अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र |
| २ | इ.१० वी पास गुणपत्रिका व प्रमाणपत्र | ८ | राष्ट्रीयत्व (नॅशनॅलिटी) प्रमाणपत्र |
| ३ | इ.१२ वी पास गुणपत्रिका | ९ | जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र |
| ४ | अर्हता परीक्षा प्रयत्न प्रमाणपत्र | १० | नॉन क्रिमीलीयर दाखला |
| ५ | अलिकडील काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो | ११ | वैद्यकिय सक्षमता प्रमाणपत्र (Medical Fitness certificate) |
| ६ | अपंग प्रमाणपत्र (लागू असल्यास) | १२ | आधारकार्डची छायांकीत प्रत |

**इतर अटी** :- १) राखीव जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणा-या ऊमेदवारांनी जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२) स्त्री ऊमेदवारांनी वसतीगृहात राहणे बंधनकारक आहे.
३) प्रशिक्षणार्थीना शासकीय तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषेदेचे नियम बंधनकारक राहतील.
४) प्रशिक्षणार्थीनांना शासकीय नियमानुसार विद्यावेतन दिले जाईल.
५) अपंगांच्या जागेवर प्रवेश घेऊ ईच्छिणाऱ्या ऊमेदवारांसाठी – फक्त ४० ते ५० टक्के पायाचे अपंगत्व असलेल्यांनीच अर्ज करावे.

**निवड** :- प्रशिक्षणार्थीची निवड ही फक्त गुणवत्ता यादीतून केली जाईल.

**इतर** :- विहीत नमुना अर्ज दिलेल्या मुदतीत सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत अधिसेविका कार्यालय श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय धुळे चक्करबर्डी परिसर धुळे येथून उपलब्ध होतील व पूर्ण भरलेले अर्ज त्याच ठिकाणी स्विकारण्यात येतील. अपूर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**प्रवेश अर्ज शुल्क** :- खुल्या वर्गांसाठी रुपये १००/- व मागासवर्गांसाठी रुपये ५०/- फी.

**अर्ज मिळण्याचा दिनांक** :- दिनांक ०१.०९.२०१७ ते ०७.०९.२०१७ स.१०.०० ते दु ५.०० वाजेपर्यंत

(रविवार व इतर शासकिय सुट्टयांदिवशीही फॉर्मवाटप सुरु राहील)

**अर्ज स्विकृतीचा दिनांक** :- दिनांक ०१.०९.२०१७ ते ०८.०९.२०१७ स.१०.०० ते दु ५.०० वाजेपर्यंत

(रविवार व इतर शासकिय सुट्टयांदिवशीही सुरु राहील)

**तात्पुरती गुणवत्ता यादी** :- दिनांक ११.०९.२०१७

**मुलाखतीसाठी पात्र ऊमेदवाराची यादी** :- दिनांक १३.०९.२०१७ रोजी अधिसेविका कार्यालय, श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय धुळे चक्करबर्डी परिसर, धुळे येथील सुचना फलकावर लावण्यात येईल.

**मुलाखतीचा दिनांक व ठिकाण** :- दिनांक १४.०९.२०१७, (उमेदवारांनी ठिक १०.०० उपस्थित रहावे) अधिसेविका कार्यालय, श्री.भाऊसाहेब हरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय धुळे चक्करबर्डी परिसर, धुळे.

**टिप** :- वाहतूक व्यवस्था व इतर कोणत्याही कारणास्तव मुलाखतीस ऊशिरा येणा-या किंवा गैरहजर राहणा-या ऊमेदवारांच्या निवडीकरिता विचार केला जाणार नाही.

गुणवत्ता यादी, प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविलेल्यांची यादी, मुलाखतीचा सविस्तर कार्यक्रम, अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी इ. अधिसेविका कार्यालय, श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चक्करबर्डी परिसर, धुळे येथील सुचना फलकावर प्रदर्शीत होईल. ते पाहणे व त्याची अमलबजावणी करणे ही ऊमेदवारांची जबाबदारी आहे. मुलाखतीस बोलविलेल्या सर्व ऊमेदवारांनी स्वखर्चाने नियोजित वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. ठरविलेल्या दिनांकास व वेळेत मुलाखतीस हजर न झालेल्या ऊमेदवारांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही व

प्रवेशाकरिता विचार केला जाणार नाही. राखीव जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणा-या ऊमेदवारांनी जात प्रमाणपत्र, पडताळणी प्रमाणपत्रासह अर्ज करावा. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास आपला प्रवेश रद्द करण्यात येईल.

अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय, धुळे

प्रत :- मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.